प्रेसनोट　　　　　　　　　　　　　　　　　　दिनांक ०१/०७/२०२५

**ठाणे – १) विनोद जयसिंग इंदुलकर – खाजगी इसम, भाईदर तलाठी सजा येथे खाजगी कर्मचारी व अपर तहसिलदार कार्यालय, मिरा भाईदर येथील लोकसेवक २) शाम बिरु बोडेकर, महसुल सहाय्यक यांचे विरुध्द लाचलुचपत विभागाकडून लाचेची रक्कम स्विकारलेबाबत गुन्हा दाखल झाले बाबत.**

| | | |
|---|---|---|
| लाचलुचपत प्रतिबंधक विभाग/घटक | :– | ठाणे |
| स्टे.डा.क्र. | :– | भाईदर पोलीस स्टेशन, मिरा भाईदर वसई विरार पोलीस आयुक्तालय दैनंदिनी क्रमांक ०२५/२०२५, वेळ २१:३४ दिनांक ०१/०७/२०२५ |
| लोकसेवकाचे नाव व कार्यालय | :– | १) विनोद जयसिंग इंदुलकर – खाजगी इसम , भाईदर तलाठी सजा येथे खाजगी कर्मचारी<br>२) अपर तहसिलदार कार्यालय, मिरा भाईदर येथील लोकसेवक शाम बिरु बोडेकर, महसुल सहाय्यक |
| मागितलेली लाचेची रक्कम | :– | २०,०००/– रूपये |
| स्विकारली लाचेची रक्कम | :– | २०,०००/– रूपये |
| थोडक्यात हकीकत | :– | यातील तक्रारदार यांनी पीएनबी हौ.फायनान्स लि. कंपनी यांचेकडून घेतलेले कर्ज थकीत झाल्याने बॅकेने त्याबाबत मा. जिल्हाधिकारी ठाणे यांचेकडे तक्रारदार यांचे तारण ठेवलेल्या घराचा ताबा मिळणेबाबत अर्ज केल्याने मा. जिल्हाधिकारी यांनी तक्रारदार यांचे राहते घर पंधरा दिवसांचे आत बॅकेकडे दयावे याबाबत नोटीस काढली होती. सदर नोटीसचे अनुषंगाने मा. अपर तहसिलदार, मिरा भाईदर यांचेकडुन तक्रारदार यांना त्यांचे राहते घर पंधरा दिवसाच्या आत बॅकेच्या ताब्यात देण्याबाबतची नोटीस बजावणी करण्यात आली होती. तक्रारदार यांना सदर नोटीसच्या विरूध्द कर्ज वसुली न्यायाधिकरण (DRT) येथे दावा दाखल करणे असल्याने तक्रारदार यांना सदर नोटीससोबतच्या कागदपत्रांची आवश्यकता असल्याने तक्रारदार मा. अपर तहसिलदार, मिरा भाईदर येथे गेल्या असता आरोपी खाजगी इसम यांनी तक्रारदार यांना सदरची कागदपत्र देण्याकरीता तसेच नोटीसच्या अनुषंगाने दि. १५/०९/२०२५ रोजी पावेतो जप्ती कारवाई न करण्याकरीता खाजगी इसम विनोद जयसिंग इंदुलकर यांनी लोकसेवक शाम बिरु बोडेकर, महसुल सहाय्यक, अपर तहसिलदार कार्यालय, मिरा–भाईदर यांचेकरीता ६०,०००/– रुपये मागणी करुन त्यापैकी खाजगी इसम इंदुलकर यांनी वेळोवेळी लोकसेवक बोडेकर यांचेकरीता ४५,०००/– रु घेतले असून उर्वरीत १५०००/– रु. लाचेची मागणी करत असलेबाबत दि. ३०/०६/२०२५ रोजी तक्रार दिली.<br>सदर तक्रारीच्या अनुषंगाने दि. ०१/०७/२०२५ रोजी करण्यात आलेल्या पडताळणी कारवाई दरम्यान खाजगी इसम विनोद इंदुलकर यांनी तक्रारदार यांचेकडून वेळोवेळी ४०,०००/– रुपये स्विकारल्याचे तसेच उर्वरीत २०,०००/– रु. लाचेच्या रकमेची मागणी केल्याचे तसेच लोकसेवक शाम बिरु बोडेकर, वय– ४७, पद– महसुल सहाय्यक, अपर तहसिलदार कार्यालय, मिरा भाईदर यांनी खाजगी इमस विनोद इंदुलकर यास तक्रारदार यांचेकडे लाचेची मागणी करण्यास तसेच लाचेची रक्कम स्विकारण्यास प्रोत्साहन दिल्याचे निष्पन्न झाले. त्या अनुषंगाने करण्यात आलेल्या सापळा कारवाई दरम्यान खाजगी इसम विनोद इंदूलकर यांनी तक्रारदार यांचेकडून लाचेची रक्कम २०,०००/– स्विकारतांना दि. ०१/०७/२०२५ रोजी १७.२३ वा. रंगेहात पकडले असुन यशस्वी सापळा कारवाई करण्यात आली आहे. तसेच लोकसेवक श्री. शाम बोडेकर यांना ताब्यात घेण्यात आले आहे. |

**मार्गदर्शन अधिकारी – १. मा. श्री. शिवराज पाटील, पोलीस अधीक्षक, अॅन्टी करप्शन ब्युरो, ठाणे परिक्षेत्र, ठाणे.**
**२. मा. श्री. सुहास शिंदे, अपर पोलीस अधीक्षक, अॅन्टी करप्शन ब्युरो, ठाणे परिक्षेत्र, ठाणे.**
**३. मा. श्री. संजय गोविलकर, अपर पोलीस अधीक्षक, अॅन्टी करप्शन ब्युरो, ठाणे परिक्षेत्र, ठाणे.**

लाचलुचपत प्रतिबंधक विभागातर्फे नागरिकांना आवाहन करण्यात येते कि,भ्रष्टाचार संबंधी काही माहिती असल्यास अगर लाच मागण्या–या लोकसेवकाबद्दल तक्रार असल्यास लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, ठाणे परीक्षेत्र यांचेशी संपर्क करावा.

---

संपर्क पत्ता – लाप्रवि ठाणे, मध्यवर्ती कारागृहासमोर, ठाणे पश्चिम ४००६०१
संकेत स्थळ– acbmaharastra@mahapolice.gov.in
Email – spacbthane@ mahapolice.gov.in
अॅप्लीकेशन – acbmaharastra.net
टोल फि नंबर– १०६४
दुरध्वनी क्रमांक – ०२२–२०८१३५९८/२०८१३५९९
व्हॉटसअॅप् क्रमांक – ९९३०९९७७००

पोलीस निरीक्षक, अॅन्टी करप्शन ब्युरो सत्यमेव जयते ठाणे

(सचिन मोरे)
पोलीस निरीक्षक,
अन्टी करप्शन ब्युरो, ठाणे